ePaper

**तामिळनाडूमध्ये मोठी दुर्घटना, कारखान्यात अमोनिया वायूची गळती होऊन 7 जणांचा मृत्यू**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™



पान 3 वरुन...

PMPML बसचालकांचा सर्रास नियमभंग

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 22 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची मविआची मागणी

# 'सरकारची कर्जमाफी फसवी.!'

महाईन्यूज । मुंबई

**राज्य सरकारच्या अपयशी कारभाराचा निषेध आणि जनतेच्या विविध प्रश्नांबाबत सरकारच्या असंवेदनशील भूमिकेविरोधात महाविकास आघाडीने विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या पारंपरिक चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय जाहीर केला. पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी सरकारवर विविध मुद्द्यांवर जोरदार टीका करत अधिवेशनात आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा दिला.**







शिवसेनेचे गटनेते भास्कर जाधव यांनी राज्यावर दुष्काळाचे गंभीर संकट ओढावल्याचे सांगत अनेक भागांत पेरण्या लांबल्या असून शेतकरी अडचणीत सापडल्याचे नमूद केले. सरकारने तातडीने सुका दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी फसवी असून विविध अटी-शर्तींमध्ये शेतकऱ्यांना अडकविण्यात आल्याचा आरोप करत शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करण्याची मागणीही त्यांनी केली.

विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील यांनी महायुती सरकारवर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करत हे "५६ टक्के कमिशन सरकार" असल्याची टीका केली. कंत्राटदारांची एक लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित असल्याने विकासकामे ठप्प झाली असून जलजीवन मिशनच्या निधीत कपात झाल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक झाल्याचेही ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्था कोलमडल्याचा आरोप केला. महिलांवरील अत्याचार, अमली पदार्थांचे वाढते जाळे आणि देवस्थान जमिनीच्या कथित घोटाळ्याबाबत सरकार कारवाई करण्यास अपयशी ठरल्याची टीका त्यांनी केली. ड्रग्ज प्रकरणांमध्ये छोट्या आरोपींवर कारवाई होते; मात्र सूत्रधार मोकाट असल्याचा आरोपही त्यांनी केला.

जितेंद्र आव्हाड यांनी सरकार विरोधकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याऐवजी टिंगल-टवाळी करत असल्याची टीका केली. विरोधकांनी मांडलेल्या मुद्द्यांवर उत्तर देण्याऐवजी पत्रातील व्याकरणावर भाष्य केले जात असल्याचे सांगत जनतेच्या प्रश्नांवर गंभीर चर्चा करण्याची सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी नसताना औपचारिक चहापानाला उपस्थित राहणे योग्य नसल्याने या कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्याचे महाविकास आघाडीने स्पष्ट केले. राज्यातील १३ कोटी जनतेशी संबंधित दुष्काळ, शेतकरी, कायदा-सुव्यवस्था, महिलांची सुरक्षा, विकासकामे आणि आर्थिक स्थिती यांसारखे प्रश्न पावसाळी अधिवेशनात आक्रमकपणे मांडणार असल्याची भूमिकाही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी व्यक्त केली.

### कर्जमाफी की कागदी घोषणा?

सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरण्याऐवजी अटी-शर्तींच्या जंजाळात अडकली आहे. प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने अनेक शेतकरी अद्यापही कर्जाच्या ओझ्याखालीच आहेत. त्यामुळे "कर्जमाफी फक्त घोषणेत, शेतकरी मात्र कर्जातच" अशी भावना ग्रामीण भागात व्यक्त होत आहे.

### अटींच्या विळख्यातील कर्जमाफी

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा मोठ्या गाजावाजात झाली; मात्र कठोर निकष, कागदपत्रांची अडचण आणि पात्रतेच्या गुंतागुंतीमुळे अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहिले. त्यामुळे कर्जमाफीच्या घोषणेपेक्षा प्रत्यक्ष मदतीचीच शेतकऱ्यांना अधिक गरज असल्याची भावना तीव्र होत आहे.



# अखेर शहरात पावसाची हजेरी

## दुपारच्या हलक्या शिडकावा; सायंकाळी गडगडाट, विजांचा कडकडाट

**महाईन्यूज । पुणे**

**गेल्या पंधरा दिवसांपासून चातकासारखी मान्सूनची वाट पाहणाऱ्या पुणेकरांना अखेर रविवारी (दि.२१) पावसाने दमदार सलामी दिली. दिवसभराच्या प्रतीक्षेनंतर सायंकाळी सुमारे पावणेचार वाजता गडगडाट, विजांचा कडकडाट आणि टपोऱ्या थेंबांसह पावसाचे शहरात आगमन झाले.**



त्याआधी दुपारी एकच्या सुमारास शहराच्या पश्चिम आणि दक्षिण भागात झालेल्या हलक्याशा शिडकाव्याने आशा निर्माण केली होती; मात्र अवघ्या दहा मिनिटांत पाऊस गायब झाल्याने पुणेकरांचा भ्रमनिरास झाला.

यंदा मान्सूनच्या आगमनाला झालेला विलंब, एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल उष्णतेची लाट सध्याचा चिंतेचा विषय आहे. कमी पावसाची शक्यता आणि संभाव्य दुष्काळाच्या चर्चांमुळे पुणेकरांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. शहरातील धरणांमधील पाणीसाठा कमी झाल्याने पाणीकपात लागू करण्यात आली होती. त्यामुळे “पाऊस कधी येणार?” हा प्रश्न प्रत्येकाच्या चर्चेचा विषय बनला होता.

रविवारी सकाळपासूनच शहरात ढगाळ वातावरण होते. आकाशात ढगांची गर्दी झाली होती; मात्र पाऊस पडत नसल्याने हवेत आर्द्रतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते. उकाड्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले होते. दुपारी सुमारे एकच्या सुमारास सिंहगड रस्ता, कात्रज, वारजे, कोथरूड आणि शहराच्या पश्चिम व दक्षिणेकडील काही भागांत हलकासा पाऊस झाला. अवघ्या काही मिनिटांच्या या सरींनी नागरिकांच्या आशा पल्लवित केल्या. अनेकांनी “अखेर मान्सून दाखल झाला” असे समजून सुटकेचा निश्वास सोडला.

मात्र हा आनंद फार काळ टिकला नाही. जेमतेम दहा मिनिटांत पाऊस थांबला आणि काही वेळातच पुन्हा कडक ऊन पडले. वाढलेली आर्द्रता आणि त्यात पडलेले उन्ह यामुळे वातावरण अधिकच उष्ण झाले. त्यामुळे नागरिकांचा भ्रमनिरास झाला. “आजही पाऊस हुलकावणी देणार की काय?” अशी चर्चा शहरभर सुरू झाली होती. मात्र दुपारनंतर वातावरण झपाट्याने बदलू लागली. साडेतीनच्या सुमारास पश्चिमेकडून काळे ढग शहराकडे सरकू लागले. काही मिनिटांतच संपूर्ण शहरावर ढगांचे आच्छादन पसरले. वातावरणात अंधारून आले. त्यानंतर अचानक सोसाट्याचा वारा सुटला. झाडांच्या फांद्या जोराने डोलू लागल्या, रस्त्यांवरील धूळ उडू लागली आणि पावसाच्या आगमनाची चाहूल लागली.

### धरणक्षेत्रातही पाऊसाची हजेर

गेल्या दोन आठवड्यांच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या या दमदार आगमनाने पुणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः धरण क्षेत्रातही अशाच स्वरूपाचा पाऊस झाल्यास पाणीकपातीचे संकट कमी होण्यास मदत होणार आहे. दुपारच्या हलक्या शिडकाव्याने हुलकावणी दिल्यानंतर सायंकाळी झालेल्या या दमदार बरसातीने मात्र पुणेकरांच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने समाधानाचे हास्य फुलविले. आता सर्वांच्या नजरा मान्सूनच्या पुढील वाटचालीकडे लागल्या आहेत.

---

# नसरापूर अत्याचार प्रकरणाचा २५ जूनला निकाल; ५५ साक्षीदारांच्या साक्षी पूर्ण

**महाईन्यूज । पुणे**

**नसरापूर येथील तीन वर्षीय चिमुकलीच्या मृतदेहाचे शवविच्छेदन अहवाल, वैद्यकीय दाखले आणि तिच्या शरीरावरील जखमांचे सविस्तर विश्लेषण करून त्या ३९ मिनिटांत झालेल्या अत्याचारांचे पुरावे विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी न्यायालयात मांडले. ‘सीसीटीव्ही फुटेज, ‘डीएनए’चा अहवाल आणि अन्य पुराव्यांच्या आधारे आरोपीचा खोटेपणा उघडा पाडताना संपूर्ण दोषारोप सिद्ध करून त्याला कठोर शिक्षा व्हावी,’ अशी मागणी अ‍ॅड. मिसर यांनी न्यायालयाकडे केली. या प्रकरणाचा येत्या २५ जूनला निकाल लागण्याची शक्यता आहे.**



चिमुकलीचे अपहरण, लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याने पीडितेला दुपारी तीन वाजून १२ मिनिटांनी घटनास्थळाकडे नेले. त्यानंतर, दुपारी तीन वाजून ५१ मिनिटांनी तो त्याच घटनास्थळावरून एकटाच परत येत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून दिसते. या तांत्रिक पुराव्यावरून पीडिता ही तब्बल ३९ मिनिटे आरोपीच्या ताब्यात होती, हे सिद्ध होते. यादरम्यान, त्याने पीडितेवर अत्यंत पाशवी अत्याचार व अनैसर्गिक संभोग केला. त्यानंतर, तिची निर्घृण हत्या करून मृतदेह लपवून ठेवला, अशी माहिती विशेष सरकारी वकील मिसर यांनी न्यायालयाला दिली.

नसरापूर येथील तीन वर्षीय मुलीवरील अत्याचाराच्या प्रकरणाची जिल्हा व सत्र न्यायालयातील विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात सुनावणी सुरू आहे. अ‍ॅड. मिसर आणि त्यांचे सहकारी अ‍ॅड. प्रथमेश शिंगणे यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे न्यायालयासमोर शनिवारी झालेल्या अंतिम युक्तिवादादरम्यान ठेवले. पीडितेच्या मृत्यूनंतरही आरोपीने निर्लज्जपणे तिच्या मृतदेहावर अत्याचार केले, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

सुनावणीदरम्यान, सरकार पक्षातर्फे नसरापूर प्रकरणातील आरोपीवर लावलेल्या प्रत्येक कायदेशीर कलमाची व्याख्या स्पष्ट करून तपास यंत्रणेने गोळा केलेल्या सहा सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेऊन गुन्ह्याचा घटनाक्रम मांडला. पीडितेचा शवविच्छेदन अहवाल, वैद्यकीय दाखले आणि तिच्या शरीरावरील जखमांचे सविस्तर विश्लेषण करून त्या ३९ मिनिटांत झालेल्या अत्याचारांचे पुरावे या वेळी न्यायालयापुढे सादर करण्यात आले आहेत.

### आरोपीच्या खोटेपणाचा पर्दाफाश

अहवाल आणि ‘डीएनए’ प्रोफाइलिंगच्या वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे आरोपीचा गुन्ह्यातील सहभाग निर्विवादपणे सिद्ध करण्यात आला. घटनेनंतर आरोपीच्या वर्तनातील संशयास्पद बाबी आणि त्याला यापूर्वीच्या खटल्यांमुळे असलेल्या कायद्याच्या ज्ञानाचा वापर करून त्याने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न कसा केला, याकडे विशेष सरकारी वकिलांनी न्यायालयाचे लक्ष वेधले.

# सिग्नलला हरताळ! PMPML बसचालकांचा सर्रास नियमभंग

## वारंवार नियमभंगामुळे अपघाताचा धोका वाढला; वाहतूक विभागाच्या भूमिकेवरही प्रश्न

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोरवाडी चौक, वल्लभनगर, शगुन चौक, नाशिक फाटा या वर्दळीच्या चौकांमध्ये पीएमपीएमएल बसचालकांकडून वाहतूक सिग्नलचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. लाल सिग्नल असतानाही बस पुढे नेणे, पादचारी मार्ग ओलांडणे आणि घाईगडबडीत चौक पार करण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एक प्रकारे पीएमपीचालक वाहतुकीच्या नियमांनाच तिलांजली देताना दिसून येत आहेत; परंतु वाहतूक पोलिस याकडे दुर्लक्ष करत आहेत.**



शहरातील वर्दळीचे चौक, बीआरटी मार्गावरील जंक्शन तसेच प्रमुख रस्त्यांवर पीएमपी बसकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे अनेक वाहनचालक आणि नागरिकांचे म्हणणे आहे. मोठ्या आकाराच्या बस वेगात सिग्नल तोडून गेल्यास अपघाताची शक्यता अधिक वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून चालावे लागत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते.

काही चौकांमध्ये सिग्नल हिरवा होण्याची प्रतीक्षा करणाऱ्या वाहनांच्या समोरून बस पुढे निघून जात असल्याने वाहतुकीत गोंधळ निर्माण होत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पीएमपी प्रशासनानेच वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे अपेक्षित आहे.

> सिग्नल परिसरात गतिरोधक उभारणीची सूचना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महापालिका आणि पीएमपी वाहतूक विभागाच्या संयुक्त बैठकीत महापालिकेला केली आहे. तसा महापालिकेच्या बैठकीत निर्णय झाला आहे. तरी तो लवकरच लागू होईल. नियम तोडून सर्रासपणे भरवेगाने सिग्नल तोडणाऱ्या बसचालकांवर स्कोड श्रो कारवाई केली जात आहे. तसे काही आढळून आल्यास बसचा फोटो काढून पीएमपी प्रशासनाला पाठवल्यास त्याचा फाइन बसचालकाच्या खिशातून कापला जातो.
>
> **- अमित डोळस, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग, पिंपरी**

मात्र, काही चालकांकडून वेळेच्या दबावाखाली किंवा निष्काळजीपणामुळे नियम धाब्यावर बसवले जात असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे.

### अपघाताचा धोका वाढला

वाहतुकीच्या नियमानुसार लाल सिग्नल तोडणे हा गंभीर वाहतूक गुन्हा आहे. मोठ्या बसकडून होणारे असे उल्लंघन केवळ इतर वाहनचालकांसाठीच नव्हे, तर पादचाऱ्यांसाठीही धोकादायक ठरू शकते. एखादी छोटी चूकही मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकते.

### गतिरोधक उभारण्याचा निर्णय



याबाबत वरिष्ठ पोलिस निरीक्षक अमित डोळस यांनी सांगितले की, सिग्नल परिसरात गतिरोधक उभारण्याबाबत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महापालिका व पीएमपी वाहतूक विभागाच्या संयुक्त बैठकीत सूचना दिल्या असून त्यानुसार निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सिग्नल तोडणाऱ्या बसचालकांवर कठोर कारवाई सुरू असून, नागरिकांनी अशा प्रकारांचे छायाचित्र किंवा पुरावे पीएमपी प्रशासनाकडे पाठवल्यास संबंधित चालकावर दंडाची कारवाई केली जाते.

---

# हिंजवडी आयटी पार्कचा कचरा आता बनणार 'ग्रीन फ्युएल'!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राजीव गांधी इन्फोटेक पार्क (हिंजवडी) येथील वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. आयटी पार्कमध्ये प्रतिदिन १० टन क्षमतेचा अत्याधुनिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात येत असून, या प्रकल्पातून दररोज १५० ते २०० किलो 'बायो-सीएनजी'ची निर्मिती केली जाणार आहे. हा प्रकल्प डिसेंबर महिन्यापर्यंत कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.**




> आयटी पार्कमधील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण करून हा प्रकल्प डिसेंबर महिन्यात कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. यामुळे आयटी पार्कमधील कचऱ्याची समस्या सुटण्याबरोबरच त्यातून 'बायो-सीएनजी' निर्मितीही होणार आहे.
>
> **- नीलेश मोढवे, अधीक्षक अभियंता, एमआयडीसी**

हिंजवडी आयटी पार्कचा झपाट्याने विस्तार झाल्यामुळे येथे दररोज सुमारे १० टन घनकचरा निर्माण होत आहे. या कचऱ्याच्या शास्त्रोक्त व्यवस्थापनासाठी आयटी पार्कमधील दोन हेक्टर जागेवर सुमारे ११ कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' (BOT) तत्त्वावर उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पाचे काम 'अभय बायो सीएनजी' कंपनीकडे देण्यात आले आहे.

मार्च २०२४ मध्ये सुरू झालेल्या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून, प्रकल्प सुरू झाल्यानंतर संबंधित कंपनी पुढील दहा वर्षे त्याचे संचालन व देखभाल करणार आहे. आयटी पार्कमधील ओला व सुका कचरा वेगळा करून त्याचे संकलन, प्रक्रिया, तसेच रस्ते व सार्वजनिक जागांची स्वच्छता करण्याची जबाबदारीही कंपनीकडे असेल.

प्रकल्पातून तयार होणाऱ्या 'बायो-सीएनजी'चा वापर वाहनांसाठी इंधन म्हणून केला जाणार असून, त्यासाठी प्रकल्प परिसरात सीएनजी पंप उभारण्याचेही नियोजन आहे. त्यामुळे कचऱ्याची समस्या सोडविण्याबरोबरच पर्यावरणपूरक वाहतुकीलाही चालना मिळणार आहे.

# मान्सूनची प्रतीक्षा आणि दुष्काळाचे सावट



## भूमिका

**मान्सूनचा हंगाम सुरू होऊन जूनचा चौथा आठवडा उजाडला, तरी महाराष्ट्रातील बहुतांश भाग अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहे. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत मान्सूनने हजेरी लावली असली, तरी उर्वरित राज्यात पावसाने अद्याप दमदार सुरुवात केलेली नाही.**

परिणामी, वाढती उष्णता, कोरडी पडलेली शेती आणि पाण्याची टंचाई यामुळे शेतकरी चिंतेत आहे. यंदाच्या मान्सूनबाबत व्यक्त होणारे अंदाजही फारसे दिलासादायक नाहीत. जागतिक हवामानातील बदल आणि एल निनोचा प्रभाव यामुळे यंदा आशिया खंडात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागानेही यंदाच्या पावसाचा अंदाज सरासरीच्या सुमारे ९० टक्क्यांपर्यंत मर्यादित राहू शकतो, असे स्पष्ट केले आहे. पावसात आणखी घट झाल्यास अनेक भागांना दुष्काळाचा सामना करावा लागू शकतो. वाढते जागतिक तापमान, मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोड आणि वातावरणातील कार्बन डायऑक्साइडची वाढ ही या परिस्थितीमागील महत्त्वाची



कारणे मानली जात आहेत.

हवामान बदलाचा सर्वाधिक फटका शेतीला बसत आहे. पावसाचे अनियमित आगमन, कमी-अधिक पर्जन्यमान, गारपीट आणि दीर्घकालीन कोरडे हवामान यामुळे पिकांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांसमोर केवळ उत्पादन घटण्याचेच नव्हे, तर आर्थिक संकटाचेही आव्हान उभे राहत आहे. त्यामुळे पारंपरिक पिकांबरोबरच हवामानाशी सुसंगत शेती पद्धती स्वीकारण्याची गरज पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे.

यंदा पावसाचा कालावधी आणि प्रमाण लक्षात घेऊन जमिनीच्या प्रकारानुसार पीक निवड करणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. हलक्या जमिनीत मूग, उडीद, मटकी आणि चवळीसारखी अल्पकालीन पिके फायदेशीर ठरू शकतात. मध्यम जमिनीत सोयाबीन, बाजरी-तूर किंवा खरीप ज्वारीची लागवड सुरक्षित पर्याय ठरू शकते. अतिखोल जमिनीत कापूस घेता येईल, तर बागायती भागात पुरेसा पाऊस झाल्यानंतरच भाजीपाला किंवा कांद्याची लागवड करणे अधिक योग्य राहील.

हवामानाचा अचूक अंदाज आणि पीक नियोजन यांची सांगड घातल्यास जोखीम कमी करता येईल. याचबरोबर पशुधनाचे संरक्षणही तितकेच महत्त्वाचे आहे. पावसाअभावी चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, पशुपालकांनी आतापासूनच चारा पिकांचे नियोजन करणे गरजेचे आहे. भविष्यातील टंचाईच्या काळात साठविलेला चारा पशुधन व दुग्धव्यवसायासाठी मोठा आधार ठरू शकतो.

तथापि, सर्व चित्र निराशाजनक नाही. काही आंतरराष्ट्रीय हवामान संस्थांनी हिंद महासागरातील सकारात्मक आयओडी (INDIAN OCEAN DIPOLE) परिस्थिती विकसित झाल्यास पावसात सुधारणा होऊ शकते, अशी शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे मान्सूनचे पुनरुज्जीवन झाल्यास दुष्काळाचे संकट काही प्रमाणात कमी होऊ शकते. मात्र, त्यासाठी निसर्गावर अवलंबून राहण्याबरोबरच जलसंधारण, पाण्याचा काटकसरीने वापर, पर्यावरण संवर्धन आणि वैज्ञानिक शेती पद्धतींचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. मान्सूनची वाट पाहताना शाश्वत नियोजन हाच भविष्यातील संकटांवर मात करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग ठरेल.

## प्रासंगिक »

### कोल्ह्याचे शेपूट

**एका कोल्ह्याचे शेपूट लोखंडी सापळ्यात अडकले. जीव वाचवण्यासाठी त्याने स्वतःचे शेपूट तोडले आणि कसाबसा पळ काढला. प्राण वाचल्याचा त्याला आनंद झाला, पण इतर कोल्ह्यांमध्ये शेपटी नसल्यामुळे त्याला लाज वाटू लागली.**

स्वतःची अप्रतिष्ठा लपवण्यासाठी त्याने एक युक्ती आखली. त्याने सर्व कोल्ह्यांना एकत्र बोलावून सांगितले, "शेपटी हा शरीरावरील निरुपयोगी भार आहे. ती कापून टाकल्याने शरीर हलके होते, अधिक वेगाने धावता येते आणि दिसायलाही चांगले वाटते. मी स्वतः हा अनुभव घेतला असून आता अधिक सुखी आहे. तुम्हीही शेपटी कापून टाका."

त्याचे बोलणे ऐकून एक अनुभवी म्हातारा कोल्हा हसला आणि म्हणाला, "मित्रा, तुझी शेपटी अजूनही असती, तर तू आम्हाला ती कापण्याचा सल्ला कधीच दिला नसतास. स्वतःची अडचण लपवण्यासाठी तू तिलाच गुण ठरवत आहेस. आम्ही तुझ्या बोलण्याला फसणार नाही."

- तात्पर्य : स्वतःचे दोष किंवा अपयश लपवण्यासाठी काही लोक त्यालाच गुण ठरवण्याचा प्रयत्न करतात; पण शहाणे लोक सत्य ओळखतात.

जगभरात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) झपाट्याने विकसित होत असताना शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर चीनने स्वीकारलेले नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण ही केवळ अभ्यासक्रमातील

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील शिक्षणाची नवी दिशा

सुधारणा नसून, भविष्यातील जगासाठी सक्षम नागरिक घडविण्याची दूरदृष्टी आहे. बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत शिक्षणाची पुनर्रचना कशी असावी, याचे प्रभावी उदाहरण चीनने जगासमोर ठेवले आहे. चीनने एआयला स्वतंत्र विषय म्हणून न पाहता संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनविले आहे. प्राथमिक स्तरापासूनच विद्यार्थ्यांना स्मार्ट तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात येत आहे, तर माध्यमिक शिक्षणात डेटा, अल्गोरिदम, डीपफेक, दिशाभूल करणारी माहिती आणि चिकित्सक विचार यांचा समावेश करण्यात आला आहे. उच्च शिक्षणात विद्यार्थी प्रत्यक्ष एआय-आधारित प्रकल्प विकसित करतात. त्यामुळे शिक्षणाचे केंद्र माहिती पाठ करण्याऐवजी समस्या सोडविण्याच्या कौशल्यांवर आले आहे.

या धोरणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शिक्षण, संशोधन आणि उद्योग यांची प्रभावी सांगड. विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योग क्षेत्र एकत्र येऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याची संधी देतात. त्यामुळे पदवीधर




विद्यार्थी केवळ प्रमाणपत्रधारक राहत नाहीत, तर उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेली कौशल्ये आत्मसात करून रोजगारासाठी सक्षम बनतात. ही पद्धत नवकल्पना, उद्योजकता आणि संशोधनाला मोठी चालना देणारी आहे.

विशेष म्हणजे चीनने एआयचा वापर केवळ संगणकशास्त्रापुरता मर्यादित ठेवलेला नाही. वैद्यक, कायदा, वित्त, अभियांत्रिकी, कला आणि व्यवस्थापन अशा प्रत्येक क्षेत्रात एआयचा समावेश करण्यात आला आहे. भविष्यात प्रत्येक व्यावसायिकाला कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान आवश्यक ठरणार असल्याची जाणीव या धोरणातून दिसून येते. तंत्रज्ञानासोबत नैतिकता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांनाही समान महत्त्व देण्यात आले आहे.

आज भारतासह अनेक देश अजूनही पारंपरिक परीक्षा पद्धती, पाठांतर आणि गुणकेंद्री शिक्षणातून पूर्णपणे बाहेर पडलेले नाहीत. मात्र, भविष्यात जागतिक स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर शिक्षण व्यवस्थेत कौशल्याधारित, संशोधनाभिमुख आणि तंत्रज्ञानस्नेही बदल अपरिहार्य ठरणार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ आधुनिक तंत्रज्ञान नसून, विचार करण्याची आणि समस्या सोडविण्याची नवी पद्धत आहे. त्यामुळे शिक्षणाचा उद्देश नोकरी शोधणारे युवक तयार करणे नसून, नवकल्पना घडविणारे, उद्योग उभारणारे आणि समाजाच्या नव्या गरजा पूर्ण करणारे सक्षम नागरिक घडविणे हा असायला हवा. चीनची वाटचाल याच दिशेने होत असून, ती जगातील इतर देशांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरू शकते.

## ।। अभंगवाणी ।।



आहांच वाहांच आंत वरी दोन्ही ।
न लगा गडणी आम्हां तैशा ॥१॥

भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा ।
आवरूनि मना बंद द्यावा ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वडिलांची बंडखोरी, लेकीची ‘मातोश्री’वर धाव

## संजय दिना पाटील यांच्या बंडखोरीनंतर राजुल पाटील यांनी स्पष्ट केली भूमिका

**महाईन्यूज । मुंबई**

**गेल्या दोन-तीन दिवसांपासून राज्यात राजकीय भूकंपाचे तीव्र हादरे बसत आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष पुन्हा एकदा फुटीच्या उंबरठ्यावर असून, पक्षाचे ६ खासदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील होण्याची दाट शक्यता आहे. यामध्ये ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांचाही समावेश असल्याची चर्चा आहे.**



या पार्श्वभूमीवर, संजय दिना पाटील यांच्या कन्या आणि नगरसेविका राजुल पाटील नेमकी कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर आज त्यांनी थेट ‘मातोश्री’ निवासस्थानी जात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांची भेट घेतली आणि आपण पक्षातच राहणार असल्याचे स्पष्ट केले.

‘मातोश्री’वरून बाहेर पडल्यानंतर राजुल पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. आपल्या भूमिकेविषयी बोलताना त्या म्हणाल्या, “मी उद्धव आणि आदित्य ठाकरेंना भेटायला आले होते. मी त्यांच्यासमोर माझी भूमिका स्पष्ट केली असून मी त्यांच्यासोबतच आहे. हा माझा निर्णय आहे. मी माझं कार्य नीट निष्ठेने पार पाडेन.”

दरम्यान, उद्धव ठाकरे लवकरच ईशान्य मुंबईचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यात राजुल पाटील यांच्या खांद्यावर कोणती जबाबदारी असेल, असे विचारले असता त्या म्हणाल्या, “मी त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित राहणार आहे. माझ्या या निर्णयावर आणि भूमिकेवर उद्धव ठाकरे अत्यंत समाधानी आणि खूश आहेत.”

दरम्यान, शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त षण्मुखानंद सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात राजुल पाटील गैरहजर होत्या. या प्रश्नावर बोलणं त्यांनी टाळलं. मात्र, वर्धापन दिनी त्यांनी फेसबूक पोस्ट करून शुभेच्छा दिल्या होत्या.

या शुभेच्छांच्या पोस्टवर उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचे छायाचित्र होते. तर, मशाल हे पक्षचिन्हही होते. त्यामुळे त्या पक्षाबरोबरच राहणार असल्याचे संकेत मिळाले होते. आज त्यांच्या प्रतिक्रियेमुळे त्यांच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### वडिलांच्या निर्णयावर प्रतिक्रिया

खासदार संजय दिना पाटील यांच्या संभाव्य बंडखोरीवर भाष्य करताना राजुल पाटील यांनी कौटुंबिक आणि राजकीय भूमिका वेगळी असल्याचे दाखवून दिले. त्या म्हणाल्या, “तो त्यांचा वैयक्तिक निर्णय आहे. आमच्या घरात प्रत्येकाला आपापले राजकीय निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यांचा अंतिम निर्णय काय आहे, ते स्वतःच जाहीर करतील.”

# बांधकामाधीन २४४ सिंचन प्रकल्पांचे भवितव्य अधांतरी, १.६५ लाख कोटींची गरज

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात सद्यस्थितीत २४४ बांधकामाधीन सिंचन प्रकल्प आहेत. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी एकूण १.६५ लाख कोटी रुपयांची गरज आहे. भूसंपादन, वन, पर्यावरण विभागाची मान्यता आणि प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन रखडल्यामुळे बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण होण्यास मोठा विलंब होत आहे. परिणामी राज्यावरील आर्थिक भार वाढतच चालला आहे.**



राज्यात सद्यस्थितीत २४४ बांधकामाधीन सिंचन प्रकल्प आहेत. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी एकूण १.६५ लाख कोटी रुपयांची गरज आहे. राज्याची सध्याची आर्थिक स्थिती पाहता नजीकच्या भविष्यात हे प्रकल्प पूर्ण होतील, अशी कोणतीही शक्यता दिसत नाही. त्यात भर म्हणून प्रकल्पांसाठीची भूसंपादनाची २,८७४ प्रकरणे प्रलंबित असून, सुमारे ६२,५१३ हेक्टर जमिनीचे संपादन करण्याची गरज आहे. प्रकल्प बाधीत गावठाणांची संख्या ३६१ असून, या गावठाणांत राहणाऱ्या कुटुंबाची संख्या ४८,५८३ इतकी असून, त्याचे स्थलांतर अद्याप झालेले नाही.

अंतिम आणि तत्वः मान्यता दिलेल्या एकूण १११ प्रकल्पांना १५.६८३ हेक्टर वन जमिनीची गरज आहे. त्यासाठी वन विभागाच्या मान्यतेची गरज आहे. संबंधित प्रकल्प पूर्ण होण्यासाठी ७०,२०६ कोटी रुपयांची गरज आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून १२,३९,१४६ हेक्टर क्षेत्रावर सिंचन सुविधा निर्माण होणार आहे. अनेक प्रकल्पांमुळे वन्य प्राण्याच्या आदिवासावर विपरीत परिणाम होणार आहे. जैवविविधताही धोक्यात येणार असल्यामुळे वन विभागाची मान्यता रखडली आहे.



“ कमी खर्चात जास्त सिंचन क्षमता निर्माण होणारे महत्त्वाचे सुमारे १३० प्रकल्प मुख्यमंत्री कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री कार्यालयाकडून नियमित आढावा घेतला जात आहे. प्रकल्प पूर्ण होण्यातील अडथळे युद्ध पातळीवर दूर केले जात आहेत. आर्थिक तरतुदीसाठी केंद्र सरकारसह अन्य वित्तीय संस्थांची मदत घेतली जात आहे.

**- राधाकृष्ण विखे – पाटील, जलसंपदा मंत्री.**

### पाटोदा सिंचन प्रकल्प ३७ वर्षांपासून रखडला

किनवट तालुक्यातील पाटोदा (खुर्द) लघु सिंचन प्रकल्पाला मे १९८९ मध्ये मान्यता मिळाली होती. प्रकल्पासाठी २ कोटी ६६ लाख २१ हजार रुपयांची निधी मंजूर करण्यात आला होता. प्रकल्पासाठी एकूण ५८.२१ हेक्टर जमीन बाधित होणार होती, त्यात ४.८५ हेक्टर वन जमिनीचा समावेश असल्याने वन विभागाकडून मंजुरी मिळाली नाही. १९९३ मध्ये प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. त्यावेळी सुमारे ४५ लाख १९ हजार रुपये खर्चही करण्यात आले. मात्र, वन जमिनीच्या प्रश्नामुळे थांबलेले काम अद्याप सुरू होऊ शकले नाही. रखडपट्टीमुळे प्रकल्पाची किंमत २.६६ कोटींवरून १०० कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे. या प्रकल्पा सारखीच अन्य प्रकल्पांची अवस्था आहे.

# राहुल गांधी फक्त एक प्यादं..

## ग्रेट निकोबार प्रकल्पावरुन केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांची टीका

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**ग्रेट निकोबार प्रकल्पा'वरून सुरू असलेला वाद अजूनही शमला नाही. एकीकडे विरोधी पक्ष काँग्रेस पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारवर निशाणा साधत आहे, तर दुसरीकडे केंद्र सरकार या प्रकल्पाचे फायदे सांगण्यात व्यस्त आहे. याच संदर्भात, केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी शनिवारी 'ग्रेट निकोबार प्रकल्पा'वर टीका केल्याबद्दल काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला.**





केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, राहुल गांधी सामरिक आणि राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या ग्रेट निकोबार बेट विकास प्रकल्पाविरोधात एक सुनियोजित मोहीम चालवत आहेत. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत रिजिजू यांनी स्पष्ट केले की, ही विरोधी भूमिका केवळ एक बहाणा असून, भारताचा भविष्यातील सामरिक फायदा आणि विकास रोखणे हा त्यामागील खरा उद्देश आहे.

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्र्यांनी असा दावा केला की, राहुल गांधींनी अंदमानमध्ये स्कूबा डायव्हिंगवर २६ कोटी रुपये खर्च केले आणि सागरी जीवांच्या चिंतेशी याचा संबंध जोडून या प्रकल्पाविरोधात हेतुपुरस्सर विरोध निर्माण केला जात आहे. भारताचे पर्यावरणविषयक कायदे अत्यंत मजबूत असून कोणीही मनमानीपणे परिसंस्थेचा नाश करू शकत नाही, असे सांगून मंत्र्यांनी विरोधी पक्षांचे आक्षेप स्पष्टपणे फेटाळून लावले. या विकास उपक्रमामुळे शोम्पेन, ग्रेट अंदमानी, जारवा आणि सेंटिनेली यांसारख्या स्थानिक जमातींच्या हिताला कोणताही धक्का लागणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले.

या द्वीप प्रकल्पाचे आर्थिक आणि सामरिक महत्त्व स्पष्ट करताना, मंत्री रिजिजू यांनी 'ब्लू इकॉनॉमी' आणि 'डीप ओशन मिशन'च्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी नमूद केले की, सरकारने ५,००० मीटर खोलीवर खनिजांचा शोध घेणे यासारखी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत, जी देशासाठी ऐतिहासिक आहेत.

### केंद्रीय मंत्र्यांचा हल्लाबोल

केंद्रीय मंत्री पुढे म्हणाले की, राहुल गांधी केवळ एक प्यादे आहेत. ते आणि त्यांचे समर्थक प्रत्येक मोठ्या पायाभूत प्रकल्पाविरोधात (जसे की धरणे, महामार्ग आणि खाणी) जनहित याचिका दाखल करून आणि आंदोलने सुरू करून देशाची प्रगती रोखण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा युक्तिवाद आहे की, केवळ एखादा पक्ष निवडणूक हरला आणि सत्तेबाहेर गेला, म्हणून त्याने राष्ट्रीय हिताच्या विकासकामांमध्ये अडथळा आणावा असे नाही.

## ५० दिवसांपासून आंदोलन; अन्नधान्याचा तुटवडा, ९० दिवसांची आणीबाणी घोषित

**महाईन्यूज । बोलिव्हिया**

**गेल्या ५० दिवसांपासून सुरू असलेल्या तीव्र सरकारविरोधी आंदोलनांमुळे अँडियन देश असलेल्या बोलिव्हियामध्ये प्रचंड मोठे संकट निर्माण झाले आहे. देशातील बिघडलेली परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी राष्ट्राध्यक्ष रॉड्रिगो पाझ यांनी शनिवारी ९० दिवसांची आणीबाणी घोषित केली असून, आंदोलकांना हटवण्यासाठी लष्कराला तैनात करण्यात आले आहे.**



### लोकांना त्यांचे स्वातंत्र्य परत मिळवून देणार: राष्ट्राध्यक्ष

देशाला संबोधित करताना राष्ट्राध्यक्ष पाझ म्हणाले, "काही लोकांच्या राजकीय स्वार्थासाठी आणि रस्ते अडवण्याच्या भूमिकेमुळे संपूर्ण बोलिव्हियन जनतेला ओलीस ठेवले जाऊ शकत नाही. या आणीबाणीचा उद्देश नागरिकांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे नसून, त्यांना त्यांचे स्वातंत्र्य परत मिळवून देणे हा आहे." रस्ते मोकळे करण्यासाठी लष्करासह बुलडोझर तैनात करण्यात आले आहेत.

सुरुवातीला राष्ट्राध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी करत सुरू झालेल्या या आंदोलनाने आता हिंसक रूप धारण केले आहे. आंदोलकांनी देशातील प्रमुख रस्ते आणि महामार्गांवर बॅरिकेड्स लावून मोठ्या प्रमाणावर नाकेबंदी केली आहे. यामुळे देशभरात अन्नधान्य, इंधन आणि वैद्यकीय साहित्याचा पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. वाहतूक कोंडी आणि वेळेत वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे आतापर्यंत किमान १७ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर हिंसाचारात ३७ हून अधिक जण जखमी झाले आहेत. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने आतापर्यंत ३६५ आंदोलकांना अटक केली आहे.

राष्ट्राध्यक्ष पाझ यांच्या प्रशासनाने देशातील वाढती वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीशी (IMF) सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर इंधनावरील सबसिडी (अनुदान) रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. तसेच देशातील अमेरिकन डॉलर्सच्या तुटवड्यामुळे आर्थिक संकट गडद झाले होते. याशिवाय, सरकारने आणलेल्या जमीन सुधारणा कायद्यानुसार जमीन गहाण ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती. यामुळे मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या बळजबरीने गरिबांच्या जमिनी बळकावतील, अशी भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली.

जरी नंतर सरकारने इंधनाचे दर स्थिर करण्याचे आश्वासन दिले आणि जमीन सुधारणा कायदे मागे घेतले, तरीही जनतेचा राग शांत झाला नाही. वाढती महागाई आणि ढासळत्या अर्थव्यवस्थेमुळे खाण कामगार, शिक्षक, वाहतूकदार आणि ग्रामीण भागातील कामगार संघटना या आंदोलनात सामील झाल्या. माजी राष्ट्राध्यक्ष इव्हो मोरालेस यांच्या समर्थकांनी या आंदोलनाला पाठिंबा दिल्याने आंदोलनाची तीव्रता अधिकच वाढली.

# रुक्मिणी AIची शिकार



बंगळूरु सायबर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कन्नड अभिनेत्री रुक्मिणी वसंत यांचे एआय-निर्मित फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर तयार करून पसरवल्याप्रकरणी तीन जणांना अटक केली आहे. पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी 'कांथारा: चॅप्टर १' या चित्रपटातील अभिनेत्रीचे मॉर्फ केलेले फोटो तयार करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स साधनांचा वापर केला आणि तिची बदनामी करून प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने ते ऑनलाइन शेअर केले. या कारवाईदरम्यान, अधिकाऱ्यांनी तीन मोबाईल फोन जप्त केले असून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे. २९ वर्षीय अभिनेत्रीने तिचे एआय-निर्मित बिकिनी फोटो ऑनलाइन व्हायरल झाल्यानंतर सायबर गुन्ह्याची तक्रार दाखल केली होती, त्यानंतर ही अटक करण्यात आली. तिने म्हटले आहे की व्हायरल झालेले फोटो बनावट आणि खोटे आहेत, तसेच तंत्रज्ञानाच्या गैरवापराविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींना त्यानंतर न्यायिक दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले आणि पुढील तपास होईपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या (बीएनएस) संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. ही फेरफार केलेली सामग्री तयार करण्यात आणि पसरवण्यात इतर व्यक्तींचा सहभाग होता का, याचाही तपास अधिकारी करत आहेत. मे महिन्यात, रुक्मिणी वसंतने व्हायरल झालेल्या एआय-निर्मित बिकिनी फोटोंचा तीव्र शब्दांत निषेध केला. तिने एक औपचारिक निवेदन जारी करून स्पष्ट केले की, मोठ्या प्रमाणावर शेअर केलेले फोटो पूर्णपणे खोटे होते आणि जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला. एका एआय-डीपफेक व्हिडिओमध्ये एका व्यावसायिक फोटोशूटच्या सेटअपमध्ये, हिरवी बिकिनी घातलेली एक महिला स्विमिंग पूलमध्ये उतरताना दिसत होती. हे व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने पसरले, ज्यामुळे ऑनलाइन चर्चा सुरू झाली आणि अनेक वापरकर्त्यांनी ते फुटेज खरे असल्याचे मानले.



## यशच्या 'टॉक्सिक'ची रिलीज डेट जाहीर

अभिनेता यशच्या 'टॉक्सिक' या बहुप्रतिक्षित चित्रपटाची अपडेट समोर आली आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. आता अखेर चित्रपटाची नवी अधिकृत रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. 'टॉक्सिक' हा चित्रपट २६ ऑगस्ट २०२६ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. सोबतच, मेकर्सनी या चित्रपटातील यशचा डबल रोल लुकही शेअर केले आहे. यशने 'टॉक्सिक'ची रिलीज डेट आणि नवीन पोस्टर शेअर करत लिहिले आहे, 'आपल्या वडिलांचा आदर करा...'

# तमन्ना-विजयचे पुन्हा पॅचअप?



बॉलिवूड अभिनेता विजय वर्मा आणि अभिनेत्री तमन्ना भाटिया हे दोघेही एकमेकांना दोन वर्षांपासून डेट करत होते. मात्र, 2025 मध्ये त्यांनी नात्याचा शेवट करत एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले होते. आता पुन्हा एकदा दोघेही चर्चेत आले आहेत. याला कारण ठरलाय तो सोशल मीडियावर व्हायरल होणारा एक व्हिडिओ. या व्हिडिओतून दोघांचे सूत पुन्हा जुळले असून त्यांचे पॅचअप झाल्याचे म्हटले जात आहे. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये विजय वर्मा आणि तमन्ना भाटिया एकत्र दिसत आहेत. दोघेही हातात हात घालून चालताना दिसत असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे. दोघेही चालत असताना एक गाडी समोर येते. या गाडीत दोघेही बसतात आणि निघून जातात. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर चाहत्यांमध्ये दोघे पुन्हा एकत्र आले आहेत का, असा सवाल विचारला जात आहे. मात्र, या चर्चांवर विजय किंवा तमन्नाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. दरम्यान, हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच चाहत्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. काहींनी दोघांच्या पुनर्मिलनाबाबत उत्सुकता व्यक्त केली, तर अनेकांनी ते पुन्हा एकत्र आले असतील तर आनंदच असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. काही चाहत्यांनी हार्ट आणि लव्ह इमोजीद्वारेही आपली भावना व्यक्त केली. विजय वर्मा आणि तमन्ना भाटिया यांनी जवळपास दोन वर्षे एकमेकांना डेट केले होते.

# भारतीय महिला हॉकी संघ 'चॅम्पियन'

## ४ वर्षांनंतर 'एफआयएच' जेतेपदावर कोरले नाव; अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा पराभव

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय महिला हॉकी संघाने चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर एफआयएच (FIH) नेशन्स कपचे जेतेपद पटकावले आहे. २०२२ मधील पहिल्या हंगामात चॅम्पियन बनल्यानंतर, आता २०२६ मध्ये भारतीय संघाने यजमान न्यूझीलंडला अंतिम सामन्यात पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयासोबतच भारतीय महिला संघाने 'एफआईएच हॉकी प्रो लीग २०२६-२७' साठी देखील क्वालिफाय (पात्रता सिद्ध) केले आहे.**




भारताने सामन्याच्या पहिल्या क्वार्टरमध्येच आघाडी घेतली होती; नवनीत कौरने चौथ्या मिनिटाला तर टोप्पो या खेळाडूने १५ व्या मिनिटाला गोल डागला. यानंतर सुनेलिता टोप्पो हिने गोल करत संघाला निर्णायक आघाडी मिळवून दिली. दरम्यान, या विजयानंतर 'एफआईएच प्रो लीग २०२४-२५' मध्ये शेवटच्या स्थानावर राहिलेल्या भारतीय महिला हॉकी संघाने आता २०२६-२७ च्या हंगामासाठी क्वालिफाय केले आहे. ही स्पर्धा २०२८ मध्ये होणाऱ्या लॉस एंजेलिस (LA) ऑलिम्पिकसाठी क्वालिफायर (पात्रता फेरी) असणार आहे. त्या दृष्टीने टीम इंडियासाठी हा विजय अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा मानला जात आहे.

आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या येथे सुरू असलेल्या महिलांच्या नेशन्स चषक हॉकी स्पर्धेत शनिवारी झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताने चिलीचा 6-0 अशा गोलफरकाने एकतर्फी पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. आता भारत आणि यजमान न्यूझीलंड यांच्यात रविवारी अंतिम सामना होईल.

या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतातर्फे नवनीत कौर आणि दीपिका यांनी प्रत्येकी 2 गोल तर नेहा आणि ऋतुजा पिसाळ यांनी प्रत्येकी 1 गोल केला. नवनीतने 6 व्या आणि 13 व्या मिनिटाला तर दीपिकाने 14 आणि 18 व्या मिनिटाला गोल नोंदविले. सामन्याच्या मध्यंतरापर्यंत भारताने चिलीवर 4-0 अशी भक्कम आघाडी मिळविली होती. नेहाने 32 व्या मिनिटाला तर ऋतुजाने 39 व्या मिनिटाला गोल नोंदवून चिलीचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आणले. या स्पर्धेतील भारताचा हा सलग चौथा विजय आहे. या उपांत्य फेरीच्या सामन्यात कर्णधार सलीमा टेटेला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात यजमान न्यूझीलंडने अमेरिकेचा पेनल्टी शूटआऊटमध्ये 4-1 असा पराभव करत अंतिम फेरी गाठली. या सामन्यात निर्धारीत वेळेत दोन्ही संघ 1-1 असे बरोबरीत होते.

### भारतीय संघाची सर्वोत्तम कामगिरी

विशेष म्हणजे, भारतीय महिला हॉकी संघाने या संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता (अजेय राहत) हे जेतेपद पटकावले आहे. भारताने या स्पर्धेची सुरुवात अमेरिकेविरुद्धच्या ३-२ अशा विजयाने केली होती. यानंतर जपान आणि उरुग्वेचा पराभव करत संघाने उपांत्य फेरीत जागा मिळवली. भारतीय संघाने उपांत्य फेरीत (सेमीफायनल) चिलीचा ६-० असा धुव्वा उडवत फायनलमध्ये धडक मारली होती. याशिवाय, भारतीय महिला हॉकी संघाने स्पर्धेत एकूण 24 गोल झळकावत आक्रमक खेळाचे दमदार प्रदर्शन केले आणि प्रतिस्पर्धी संघांवर संपूर्ण वर्चस्व गाजवले.

# विराट कोहली- बुमराहचे पुनरागमन; हर्षित राणाला संधी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेला दुखापतीमुळे मुकल्यानंतर, आगामी इंग्लंड दौऱ्यातील वन-डे (ODI) मालिकेसाठी विराट कोहलीचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) आज (दि.२१) संघाची घोषणा केली. भारत आणि इंग्लंड यांच्यात १४ जुलै (एजबॅस्टन), १६ जुलै (सोफिया गार्डन्स) आणि १९ जुलै (लॉर्ड्स) रोजी तीन वन-डे सामने खेळवले जाणार आहेत.**




वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचेही वन-डे संघात पुनरागमन झाले आहे. बीसीसीआयच्या 'वर्कलोड मॅनेजमेंट'चा भाग म्हणून त्याला अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी आणि तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेतून विश्रांती देण्यात आली होती.

आयपीएल २०२६ (IPL 2026) च्या फायनल दरम्यान कोहलीच्या पायाचे स्नायू दुखावले (Hamstring Injury) होते, ज्यामुळे त्याला अफगाणिस्तानविरुद्धच्या वन-डे मालिकेतून बाहेर पडावे लागले होते.

ऑलराउंडर अक्षर पटेलने देखील अफगाणिस्तान मालिकेनंतर वन-डे संघात पुनरागमन केले आहे. मात्र, इंग्लंड दौऱ्यासाठी यशस्वी जयस्वाल आणि मोहम्मद सिराज यांना संघात स्थान मिळालेले नाही.गुरनूर ब्रारने संघात आपले स्थान कायम राखले आहे. दुसरीकडे, प्रिन्स यादवला वगळण्यात आले असून हर्षित राणाचे संघात पुनरागमन झाले आहे. इंग्लंडविरुद्धच्या महत्त्वाच्या वन-डे मालिकेसाठी भारतीय संघात अनुभवी आणि युवा खेळाडूंचा समतोल साधण्यात आला असून, आगामी स्पर्धांच्या दृष्टीने ही मालिका संघासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

### भारताचा वन-डे संघ

शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली*, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), के. एल. राहुल (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, गुरनूर ब्रार या खेळाडूंचा समावेश यावेळी भारतीय संघामध्ये वन डे साठी करणार असल्याची घोषणा बीसीसीआयने केली आहे.

### यशस्वी जयस्वाल, मोहम्मद सिराजला स्थान नाही

ऑलराउंडर अक्षर पटेलने देखील अफगाणिस्तान मालिकेनंतर वन-डे संघात पुनरागमन केले आहे. मात्र, इंग्लंड दौऱ्यासाठी यशस्वी जयस्वाल आणि मोहम्मद सिराज यांना संघात स्थान मिळालेले नाही.गुरनूर ब्रारने संघात आपले स्थान कायम राखले आहे. दुसरीकडे, प्रिन्स यादवला वगळण्यात आले असून हर्षित राणाचे संघात पुनरागमन झाले आहे.

# सल्लागारांवर 'रेड सिग्नल'; महापालिकेचा मोठा निर्णय

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रत्येक लहान-मोठ्या कामासाठी बाह्य सल्लागार नेमण्याच्या पद्धतीला आता लगाम बसणार आहे. सल्लागारांवर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च रोखण्यासाठी आणि प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक व उत्तरदायी करण्याच्या उद्देशाने स्थायी समितीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे अत्यावश्यक तांत्रिक कामांशिवाय सल्लागारांची नियुक्ती केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

महापालिकेत तांत्रिकदृष्ट्या सक्षम अधिकारी व अभियंते उपलब्ध असतानाही अनेक कामांसाठी बाह्य सल्लागारांची नियुक्ती केली जात असल्याबाबत नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. काही विशिष्ट सल्लागार संस्थांना वारंवार कामे दिली जात असल्याच्या तक्रारींवरूनही बैठकीत चर्चा झाली. प्रकल्प नियोजनातील त्रुटी, कामांचा विलंब आणि दर्जाबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे या नियुक्त्यांवर पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली.

स्थायी समितीने आता सर्व विद्यमान सल्लागार करारांची तातडीने समीक्षा करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या कामांसाठी सल्लागारांची आवश्यकता नाही, त्या करारांना रद्द करण्याची प्रक्रिया हाती घेतली जाणार आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या आर्थिक शिस्तीला बळकटी मिळण्याबरोबरच जनतेच्या पैशांचा अधिक प्रभावी वापर होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> "महापालिकेच्या तिजोरीतील प्रत्येक रुपया हा करदात्या नागरिकांचा आहे. त्यामुळे अत्यावश्यक तांत्रिक कामांशिवाय सल्लागारांची नियुक्ती केली जाणार नाही. अनावश्यक खर्चाला लगाम घालून प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हा निर्णय घेतला आहे."
>
> - **अभिषेक बारणे**, अध्यक्ष, स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड महापालिका

स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले की, महापालिकेच्या तिजोरीतील प्रत्येक रुपया हा करदात्या नागरिकांचा आहे. त्यामुळे अनावश्यक सल्लागारांवर होणारा खर्च टाळणे आवश्यक आहे. यापुढे केवळ अत्यंत गुंतागुंतीच्या तांत्रिक कामांसाठीच सल्लागार नेमले जातील. अधिकारी स्वतःची जबाबदारी टाळून सल्लागारांवर अवलंबून राहिल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. खर्चात होणारी बचत शहरातील मूलभूत सुविधा आणि विकासकामांसाठी वापरण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.





# गायत्री इंग्लिश मेडियम स्कूलमध्ये योग दिन उत्साहात

## ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन तसेच विविध श्वसनक्रियांचे प्रात्यक्षिक सादर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**गायत्री इंग्लिश मेडियम स्कूल, मोशी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात योग दिनाच्या महत्त्वाविषयी माहिती देऊन करण्यात आली. योग ही भारताची प्राचीन आणि अमूल्य परंपरा असून निरोगी शरीर, शांत मन आणि संतुलित जीवनासाठी योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.**



यावेळी विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे विविध योगासने व प्राणायामाचा सराव केला. ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन तसेच विविध श्वसनक्रियांचे प्रात्यक्षिक उत्साहाने सादर करण्यात आले.

शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे महत्त्व पटवून देत योग हा केवळ एका दिवसाचा उपक्रम नसून निरोगी जीवनशैलीचा अविभाज्य भाग असल्याचे सांगितले. तसेच दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्याचे आवाहन करण्यात आले.

गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्सचे आदरणीय अध्यक्ष मा. श्री. विनायक भोंगाळे सर यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांना शुभेच्छा देत निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनासाठी नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले.

यावेळी नगरसेविका मा. सौ. कविताताई भोंगाळे पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा देत योगाचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी नियमित योगाभ्यास करून निरोगी जीवनशैली अंगीकारावी तसेच योगाच्या माध्यमातून शिस्त, एकाग्रता आणि सकारात्मक विचार विकसित करावेत, असे त्यांनी मार्गदर्शन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्रीमती अंजली भागवत तसेच विपणन प्रमुख मा. श्री. शैलेंद्र सिंग यांनी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना नियमित योगाभ्यासाचे महत्त्व सांगितले.तसेच निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करून योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्याचे आवाहन त्यांनी केले.

### योगाचार्य श्री. सोमदत्त मुदगल यांचे मार्गदर्शन

यावेळी योगाचार्य श्री. सोमदत्त मुदगल यांनी विद्यार्थी, शिक्षक व पालकांना योगाचे शास्त्रीय महत्त्व आणि दैनंदिन जीवनातील उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने योगासने सादर करून योगाबद्दलची जागरूकता आणि उत्साह दर्शविला. संपूर्ण शाळा परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला होता. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी नियमित योग करण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून निरोगी आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

# पिंपरी-चिंचवड "आयआयएम" शाखा उभारणीला "बुस्टर"

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि अभिमानास्पद बातमी आहे. शहरात 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' (IIM) ची शाखा उभारणीला मोठा 'बुस्टर' मिळाला असून, राज्य सरकारच्या कॅबिनेट मंत्रीमंडळ बैठकीत या संस्थेसाठी मोशी येथील शासकीय जागा निशुल्क देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.**

पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि अभिमानास्पद बातमी आहे. शहरात 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' (IIM) ची शाखा उभारणीला मोठा 'बुस्टर' मिळाला असून, राज्य सरकारच्या कॅबिनेट मंत्रीमंडळ बैठकीत या संस्थेसाठी मोशी येथील शासकीय जागा निशुल्क देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी यासंदर्भात केलेल्या सातत्यपूर्ण मागणीला आणि पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. आयआयएम नागपूरची विस्तारीत शाखा पिंपरी-चिंचवडमधील मोशी येथे व्हावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय आणि महसूल विभाग यांनी यासाठी आधीच सकारात्मकता दर्शवली होती. आता राज्य सरकारच्या कॅबिनेट मंजुरीमुळे या भव्य प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे.




> "पिंपरी-चिंचवडला देशातील अग्रगण्य 'एज्युकेशन हब' (EDUCATION HUB) बनवणे हा आमचा संकल्प आहे आणि 'आयआयएम' (IIM) च्या रूपाने या संकल्पाला आज सर्वात मोठे बळ मिळाले आहे. आपल्या शहरात ही राष्ट्रीय स्तरावरील संस्था सुरू व्हावी, यासाठी मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी सुरुवातीपासूनच आम्हास सकारात्मक पाठबळ दिले आणि कॅबिनेट बैठकीत निशुल्क जागा मंजूर करून या स्वप्नाला गती दिली आहे. उद्योग, आयटी आणि उच्च शिक्षण यांचा हा त्रिवेणी संगम शहराच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी ठरेल!"
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.**

# प्रियदर्शनी स्कूल आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, शिक्षक व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योगतज्ज्ञांनी उपस्थितांना योगाचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व समजावून सांगितले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहते, मन शांत व एकाग्र होते तसेच तणाव कमी होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. सहभागींस विविध योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन करण्यात आले.

योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी आणि संतुलित जीवनशैलीचा पाया आहे, असेही तज्ज्ञांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वांनी दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचा संकल्प केला. शाळेच्या या उपक्रमाचे पालक व उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या प्राचार्या तसेच व्यवस्थापनाने सर्व सहभागी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन करून निरोगी जीवनासाठी योगाचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. "योगः कर्मसु कौशलम्" या संदेशासह सर्वांनी निरोगी व आनंदी जीवनासाठी योगाला दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्याचा संकल्प केला.



# व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये योग दिन उत्साहात

## विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्याचा उद्देश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड येथील मोरया शिक्षण संस्थेच्या व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या श्रीमती सुनीता भिडे आणि संस्थेच्या कार्यवाह, तहहयात विश्वस्त व प्राचार्या मा. सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर यांच्या हस्ते 'ॐ' प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाली.

मार्गदर्शनानंतर शाळेच्या मैदानावर योग प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली. उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने १२ सूर्यनमस्कार घातले. यासोबतच शारीरिक संतुलन आणि एकाग्रता वाढवणारी वृक्षासन, ताडासन, पद्मासन यांसारखी विविध आसने व प्राणायाम उत्साहाने केले.

योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व आणि त्यातून मिळणारे शारीरिक व मानसिक आरोग्य याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. नियमित योगाभ्यासामुळे तणाव कमी होऊन सकारात्मक ऊर्जा वाढते, असा संदेश यावेळी देण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध योगासनांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. योगाच्या माध्यमातून निरोगी आणि सुदृढ जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहनही करण्यात आले.

शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुबक सूत्रसंचालन सौ. मेधा उजळंबकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सौ. वैशाली येळे यांनी मानले. सर्व उपस्थितांनी दररोज योग करण्याचा संकल्प करत कार्यक्रमाची सांगता केली. योग दिनानिमित्त शाळेच्या परिसरात उत्साहपूर्ण आणि सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांनी योगाबाबत जागरूकता वाढविण्याचा संदेश देत निरोगी भारताच्या संकल्पनेला पाठिंबा दर्शविला.

### योग हा जीवनाचा अविभाज्य भाग

प्रास्ताविक भाषण करताना प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाची पार्श्वभूमी सांगून दैनंदिन जीवनात योगाचे असलेले स्थान स्पष्ट केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्या श्रीमती सुनीता भिडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, "निरोगी शरीर आणि शांत मनासाठी योग हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असणे आवश्यक आहे. यम, नियम, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांमुळे मानवी आयुष्य अधिक सुदृढ आणि सकारात्मक बनते."

# प्रतिभा महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन व महिला सुरक्षा सत्र उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीजच्या राष्ट्रीय सेवा योजना व प्रतिभा ज्युनियर कॉलेजच्या सखी सावित्री समितीचे वतीने पिंपरी पोलीस ठाणे मधील दामिनी पथकाच्या ललिता फडतरे व ज्योती चापुडे यांनी विद्यार्थ्यांना महिला सुरक्षा , आपत्कालीन महिला हेल्पलाईन , सायबर सुरक्षितता , आणि स्वसंरक्षणाचे मूलभुत धडे शिकविले.**



तुमची सुरक्षा तुमच्या हातात आहे . धाबरू नका . प्रसंगी आवाज उठवा , दामिनी पथक तूमच्या साठीच आहे असा विश्वास त्यानी विद्यार्थीनीना दिला .

तसेच आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम उत्साहात महाविद्यालयाच्या प्रांगणात साजरा झाला. विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी किमया आश्रम चॅरिटेबल ट्रस्टच्या मेजर राजू ढमाले व त्याच्या सहकारीनी उपस्थितांना सूक्ष्म व्यायाम , योगासने , सूर्यनमस्कार , प्राणायमचे प्रात्यक्षिके, व ध्यानाचे प्रशिक्षण देत शारीरिक-मानसिक आरोग्य व दैनंदिन योगाचे महत्व पटवून देण्यात आले. रोज पंधरा मिनिटे योग केल्याने ताण कमी होतो , एकाग्रता वाढते आणि परीक्षा काळात मन शांत राहते असा सल्ला मार्गदर्शन करताना त्यानी दिला . शारीरीक शिक्षण विभाग प्रमुख डॉ . शबाना शेख , राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सुकलाल कुंभार , प्रा सुप्रीया गायकवाड यांनी संयोजन केले . प्रास्ताविक डॉ . शबाना शेख , व प्रा रुची यादव यांनी केले . उपस्थित तज्ञ प्रशिक्षक व आदी मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला . असा दुहेरी कार्यक्रम संपन्न झाला .

कार्यक्रमाला उपस्थित असलेले संस्थेचे संस्थापक सचिव डॉ . दीपक शहा, खजीनदार डॉ. भूपाली शहा , संचालिका डॉ . तेजल शहा , मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ राजेंद्र कांकरीया, वरीष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी , उपप्राचार्या डॉ . जयश्री मुळे , प्रतिभा ज्यूनिअर कॉलेजच्या प्राचार्या डॉ . वनिता कुऱ्हाडे , विभाग प्रमुख डॉ. श्रुती गणपुले, यांचे मार्गदर्शन लाभले.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station